कार्यालय पोलीस अधीक्षक

दिनांक ०८/०८/२०१७

मिळालेल्या गुप्त बातमीदाराच्या खबरेवरुन मा. पोलीस अधिक्षक साो. तसेच मा. अपर पोलीस अधिक्षक साो. यांचे आदेशान्वये तसेच मा. प्रभारी अधिकारी स्थागुशा, गडचिरोली यांचे मार्गदर्शनाखाली नामे- अमित दिलीप पिपरे, वय-२४ वर्षे, व्यवसाय मजुरी, रा. सोनापुर (सामदा) ता. सावली, जि. चंद्रपूर. सध्या रा. हनुमान वार्ड, गडचिरोली हा त्याचे ताब्यातील स्कोडा वाहन क्रमांक एमएच-०२ एयु/४९९० या वाहनाने अवैधरित्या विदेशी दारु त्याचा सहकारी नामे- दिलीप कुकुडकर रा. हनुमान वार्ड, गडचिरोली यांनी विदेशी दारु विकत घेवून विक्री कामी गडचिरोली शहरात तसेच आजुबाजुच्या गावात स्कोडा चारचाकी वाहनाने पुरवठा करणार असल्याची गुप्त माहिती प्राप्त झाली. त्यावरुन मिळालेल्या बातमीच्या खबरेवरुन गडचिरोली येथील दारूबंदी पथकाने, मौजा धुडेशिवनी फाटा येथे सापळा रचुन नमुद स्कोडा चारचाकी वाहनाची अवैध दारु संदर्भात झडती घेतली असता त्याचे ताब्यातील नमुद स्कोडा कंपनीच्या चारचाकी वाहनातून विदेशी दारुच्या किंमत ११,२४,४००/- रु. विदेशी दारुचा माल अवैधरित्या वाहतुक करताना अमित दिलीप पिपरे वय-२४ वर्षे व्यवसाय मजुरी रा. सोनापुर (सामदा) ता. सावली, जि. चंद्रपूर. हल्ली मु. हनुमान वार्ड, रा. गडचिरोली यांचे ताब्यातून मिळून आल्याने सदरचा माल तसेच स्कोडा चारचाकी वाहन पंचासमक्ष जप्त केला. यावरुन दोन्ही आरोपीताविरुध्दात पोलीस स्टेशन गडचिरोली येथे महा.दारूबंदी अधिनियम कलम ६५ (अ) (ई), ८३, ९८ (२) (१) अन्वये गुन्हा नोंद केला. पुढील तपास पोस्टे गडचिरोली येथे चालु आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख तसेच अपर पोलीस अधिक्षक यांचे आदेशान्वये तसेच प्रभारी अधिकारी, स्थागुशा गडचिरोली यांचे मार्गदर्शनाखाली पोहवा प्रमोद वाळके, पोना दुधराम चवारे, मपोशि दुर्गा साखरे, प्रदिप चवरे यांनी पार पाडली.

